**श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ**

श्रीरेणुकामाता मदिर औरंगाबाद

जय देवी अंबाबाई | परशुरामाचे आई ||

आरती ओवाळीन | माझे रेणुकाई || जय देवी || ध्रु ||

मातापुरी तुझा वास | भक्त धरिती ध्यास ||

संकट समयास | धाव घेई तू ख़ास ||जयदेवी || १||

काय वर्णु तुझे गुण | शेष थकलासे जाण ||

अज्ञान हरी पाही | आंबे देई दर्शन || जयदेवी ||२||

जय जय रेणुके | श्रीमाते | माहूरगढी वसते

भक्ता देई तू | मुक्ती हो | मुळपीठ नायिके ||धृ||

उंच बसलीस | डोंगरी | अरण्याभीतरी |

हिंस्त्र पशूंच्या | हो राणी | पावे मज निर्वाणी ||१||

डोंगर पायथी तलाव | मातृक नामे थोर |

जन येती हो | स्नानांसी पावती मनोरथासी ||

ऐसी तव लीला | अंबाई | दर्शन दे ग आई ||२||

दत्त नामे हो | शिखर | अनुसूया डोंगर |

भद्रकाली ती | समोर | नांदे परशुराम ||

भक्ता करीतसे | पावन | लागो तुझे ध्यान ||३||

तीर्थे असती | १०८ |सर्व ही बहुश्रेष्ट |

सर्व तीर्थ हे | पवित्र | मना आनंद देत ||

तेथ पाहुनिया | ती शोभा | हरि तन्मय उभा ||४||